
# २ पटाचारा थेरीगाथा

(पटाचारा थेरीगाथा ही थेरीगाथा ग्रंथामधील एक महत्त्वाची थेरीगाथा आहे. या पटाचाराथेरीगाथे मध्ये पटाचारा भिक्खुनीचे जीवनानुभव आलेले आहेत. पटाचारा ही तथागत बुद्धाच्या काळातील थेरी आहे. तिला तथागत बुद्धाचा संपर्क लाभलेला आहे. थेरीगाथा मधील पटाचारा थेरीचे जीवन हे अतिशय महत्त्वाचे असून भिक्खुनी संघामध्ये प्रवेश घेतल्यानंतर भिक्खुनी जीवनाचे जे अनुभव आलेले आहेत ते अनुभव या थेरीगाथे मध्ये सांगितलेले आहेत. या थेरीगाथे मध्ये अनेक व महत्त्वपूर्ण बौद्ध संकल्पना आलेल्या आहेत. त्याच प्रमाणे पटाचाराने सर्वसामान्य जीवनाचे वास्तव अतिशय सुंदर पद्धतीने गाथाबद्ध केलेले आहेत.)



''नङ्गलेहि कसं खेत्तं, बीजानि पवपं छमा ।
पुत्तदारानि पोसेन्ता, धनं विन्दन्ति माणवा ।।१।।

''किमहं सीलसम्पन्ना, सत्थुसासनकारिका ।
निब्बानं नाधिगच्छामि, अकुसीता अनुद्धता ।।२।।

''पादे पक्खालयित्वान, उदकेसु करोमहं ।
पादोदकं च दिस्वान, थलतो निन्नमागतं ।।३।।

‘‘तत्तो चित्तं समाधेमि, अस्सं भदं व जानियं ।
ततो दीपं गहेत्वान, विहारं पाविसि अहं ।
सेय्यं ओलोकयित्वान, मञ्चकम्हि उपाविसि ।।४।।

‘‘ततो सूचिं गहेत्वान, वट्टिं ओकस्सयामहं ।
पदीपस्सेव निब्बानं, विमोक्खो अहु चेतसो’’ति ।।५।।

**(खुद्दकनिकाये – थेरीगाथापालि)**

**शब्दार्थ / सद्दत्थ**

**पवपं (रपति)** – बिज पेरणारा.

**छमा (स्त्री.)** – पृथ्वी, जमिन.

**पक्खालयित्वान (पू.क्रि.)** – पाय स्वच्छ करून, पाय धुतांना.

**विमोक्खो (विमोक्ख पु.)** – विमुक्त झाले.

**वट्टि (स्त्री.)** – वात, बत्ति.

**सेरयं** – श्रेयस्कर.

**नङ्गलेहि (नङ्गल नपुं)** – नांगराने.

**पोसेन्ता (पीसेति – क्रि.)** – पालण पोषण करतात.

**थलतो (थल – नपुं.)** – जमिनीवर.

**उपाविसि (क्रि.)** – स्थानापन्न होणे, आसनस्थ होणे.

**अकुसीता** – उत्साही, जागृत.

## अभ्यास

**प्रश्न १ : समानार्थी शब्द द्या.**

पुत्त – अत्तज.

दीप – दीपक.

थल – भू (भूमि).

उदकं – वारि.

**प्रश्न २ : रूपे ओळखा**

गहेत्वान, विन्दन्ति, पक्खालयित्वान.

**प्रश्न ३ : पटाचारा थेरीचे चरित्र रेखाटा.**